# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-12.04.2026** **वार- रविवार**

---

**आशा भोसले निधन**

प्रख्यात अष्टपैलू गायिका आशा भोसले यांचं आज मुंबईतील रुग्णालयात  निधन झालं, त्यांचे पुत्र आनंद भोसले यांनी ही माहिती दिली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना काल रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्या 92 वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांचं पार्थिव लोअर परळ इथल्या त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार असून उद्या संध्याकाळी शिवाजी पार्क स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

आठ सप्टेंबर १९३३ रोजी मंगेशकर कुटुंबात  जन्मलेल्या आशा भोसले यांना त्यांच्या अन्य भावंडांप्रमाणेच सुरांच्या वारसाबरोबरच संगीत प्रतिभेचं वरदान लाभलं होतं. वयाच्या १०व्या वर्षी गायनक्षेत्रात पदार्पण  केलेल्या आशा भोसले यांची वयाच्या नव्वदीतही संगीताची सेवा सुरूच होती. गानसम्राज्ञी लता मंगेशकर सिनेसंगीत विश्वावर अधिराज्य करत असताना आशा भोसले यांनीही आपला ठसा उमटवत संगीत रसिकांच्या मनात मानाचं स्थान प्राप्त केलं. नाट्यगीतांपासून गझलपर्यंत, भावगीतांपासून पाश्चात्य धाटणीच्या गीतांपर्यंत मराठी, हिंदीशिवाय इतर अनेक भारतीय भाषांमधील असंख्य विविध प्रकारची गाणी त्यांनी गायिली. अनेक पिढ्या त्यांनी गायलेली गाणी ऐकत मोठ्या झाल्या. त्यांच्या सुमधुर गीतांची गोडी रसिकांच्या मनात कायम राहिली आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कारकिर्दीत त्यांना अनेक प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. भारत सरकारनं त्यांना पद्मविभूषण हा सर्वोच्च पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं, तर सन दोन हजार मध्ये त्यांना भारतीय चित्रपटसृष्टीतल्या दादासाहेब फाळके या सर्वोच्च पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. .

आशा भोसले यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्रिमंडळातील अनेक वरिष्ठ मंत्री तसंच राज्यपाल जिष्णुदेव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आदी मान्यवरांनी दुःख व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**सुनेत्रा पवार प्रचार**

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराचा आज औपचारिक शुभारंभ करण्यात आला. या निमित्तानं आयोजित प्रचार मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या अदिती तटकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. यावेळी त्यांनी सुनेत्रा पवार यांना मोठ्या मताधिक्यानं विजयी करण्याचं आवाहन केलं. बारामती मतदारसंघातील ही निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची मानली जात असून, प्रचाराला वेग येताना दिसत आहे.

**<u>मेट्रो वाढ</u>**

हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यानंतर प्रवासी संख्येत वाढ अपेक्षित असल्याने आधीच्या दोन मार्गावरील डबे वाढवणार असल्याचं महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी सांगितलं. त्यासाठीचा अहवाल तयार करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या पिंपरी चिंचवड ते स्वारगेट, वनाझ ते रामवाडी या मार्गांवरून धावणाऱ्या मेट्रोचा दरदिवशी जवळपास २ लाख प्रवासी वापर करत आहेत.

त्यासाठी सध्या तीन डबे वापरात आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो सुरू झाल्यावर प्रवासी संख्येत एक ते दीड लाखांची वाढ अपेक्षित आहे. मेट्रोला होणारी गर्दी पाहता विस्तारित मार्गिकांसाठी दोन टप्प्यात १२ आणि १५ गाड्या नव्याने दाखल होतील, असंही हर्डीकर यांनी सांगितलं.

**<u>प्रकाशन विक्रम</u>**

सांगवी इथं आयोजित कार्यक्रमात ४४ लेखकांची ५० पुस्तकं एकाच वेळी प्रकाशित करून आज अनोखा जागतिक विक्रम प्रस्थापित करण्यात आला. वेलवेट पब्लिकेशन आणि झेप सामाजिक संस्था यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचं आयोजन करण्य़ात आलं होतं. या उल्लेखनीय उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स तसंच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली आहे. साहित्यप्रेमींच्या मोठ्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला. विक्रमाची अधिकृत घोषणा करत अशोक आदक यांनी प्रशस्तीपत्र प्रदान केलं.

**<u>‘ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026’</u>**

परदेशात उच्च शिक्षण घेण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी ‘स्टडी स्मार्ट’च्या वतीने पुण्यातील बोट क्लब येथे आयोजित करण्य़ात आलेल्या ‘ग्लोबल एज्युकेशन फेअर 2026’ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या फेअरमध्ये यूके, यूएसए, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, जर्मनी आणि दुबई येथील सुमारे ५० हून अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. विद्यार्थी आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून परदेशी शिक्षणासंदर्भातील विविध पर्यायांची माहिती घेतली., या ठिकाणी विद्यार्थ्यांना आणि पालकांना पूर्णपणे मोफत मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात उद्या आकाश निरभ्र राहील. कमाल ३९ तर किमान २० अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**